Ex. 12/B

रे.क.नं. १०/२०२६

मे. सिव्हील जज् ज्युनियर डिव्हीजन मलकापूर - शाहूवाडी

यांचे कोर्टात...

Digitally signed by Pankaj Bhimrao Pawar

विद्या विजय बारटक्के - वादी

विरूध्द

Order
---
R & R

१. रिध्दी रमेश माळवदे
२. अनंकिता हनुमंत तेंडोलकर
३. वीणा दिलीप सुपेकर

} प्रतिवादी

यातील प्रतिवादी नं. १ ते ३ यांची कैफियत खालीलप्रमाणे -

१. वादीचा दावा खरा व बरोबर आहे. तो आम्ही तिन्ही प्रतिवादींना मान्य व कबूल आहे.

२. वादीचे दावेतील कलम १ मधील नमुद वादी इचे विजय गणपती बारटक्के यांचेशी लग्न झाले होते हा मजकूर खरा व बरोबर आहे. श्री. विजय हे आम्हा तिघींचे वडील आहेत व वादी ही आमची आई आहे.

३. वादी इचे पतीचे गजापूर येथे घर व जमीन आहे, हा मजकूर खरा व बरोबर आहे व सदरचे घर आमचे वडील विजय गणपती बारटक्के यांचे नावे आहे, हा दावेतील कलम ३ मधील मजकूर खरा व बरोबर आहे.

४. वादीचे दावेतील वादीचे पती हरविले आहेत व वादी आईने रफी अहमद किडवाई मार्ग, पोलिस ठाणे मुंबई येथे दिनांक १८/०९/२०१३ इ. रोजी तक्रार

22/8/26
Assistant Superintendent

दिली होती, हा मजकूर खरा व बरोबर आहे. तसेच बेपत्ता व्यक्ती म्हणून आमचे वडिलांची पोलिसांनी तक्रार दाखल केली होती व आमचे आईस दिनांक १०/०७/२०२४ रोजी वडील हरविलेचे प्रमाणपत्र दिले आहे. त्यामुळे वादीचे कलम ४ मधील मजकूर खरा असून तो आम्हाला मान्य व कबूल आहे.

४. दिनांक १८/०९/२०१३ पासून आमचे वडील १३ ते १४ वर्षे होवूनही परत आले नाहीत. संपर्क नाही, ठावठिकाणा नाही, त्यामुळे ७ वर्षाचे वर १३ वर्षापर्यंत आमचे वडील अद्याप परत आलेले नसलेने विजय गणपती बारटक्के हे मयत म्हणून घोषीत होवून मिळावे म्हणून कलम ५ मधील मजकूर योग्य व बरोबर आहे.

५. वादीचे पती व आमचे वडील हे मयत असणार ही आमची खात्री आहे व पोलिसांनी चौकशी करूनही वडील सापडले नाहीत त्यामुळे आई व आम्ही तिन्ही मुलींना वडील विजय गणपती बारटक्के हे मयत असलेचे घोषीत होवून मिळावे.

६. वादीची कलम १० मधील अ ब ची मागणी मंजूर करणेस प्रतिवादीची कोणतीही हरकत नाही.

येणेप्रमाणे कैफियत असे.

शाहूवाडी

दिनांक – २४/०८/२०२६

R. Makade

अनंकिता

सौ. विणा दिलीप सुपेकर.

24/8/26
Assistant Superintendent

## प्रतिज्ञा

आम्ही यातील प्रतिवादी नं. १ ते ३ सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील कैफियतीमधील सर्व मजकूर आमचे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केली प्रतिज्ञा आज मुक्काम शाहूवाडी.

दिनांक - २४/०८/२०२६

१ R.Malwade

2 अनंकिता

3 सौ. विणा दिलीप सुपेकर

## ॲफिडेव्हीट

मी प्रतिवादी नं. १ माझे नाव रिध्दी रमेश माळवदे, व. व. ४६, धंदा - घरकाम, रा. रूम नं. ७, २०/ए, नेत्रावती नागरी निवारा, सीएचएस लि., प्लॉट नं. ६, जनरल अरूणकुमार वैद्य मार्ग, गोरेगाव पुर्व, मुंबई ४०००६५, स्वतःकरीता व प्रतिवादी नं. २ व ३ करीता देवाची शपथ घेवून सत्य सांगते की, वरील कैफियतीमधील सर्व मजकूर खरा व बरोबर आहे म्हणून केले ॲफिडेव्हीट आज मु. शाहूवाडी.

दिनांक - २४/०८/२०२६

मी ॲफिडेव्हीट करणार यास ओळखतो.

ॲडव्होकेट के. आर. पोवार

R.Malwade

24/8/26
Assistant Superintendent

प्रतिज्ञा

मी प्रतिवादी नं. १ माझे नाव रिध्दी रमेश माळवदे, व. व. ४६, धंदा - घरकाम, रा. रूम नं. ७, २०/ए, नेत्रावती नागरी निवारा, सीएचएस लि., प्लॉट नं. ६, जनरल अरूणकुमार वैद्य मार्ग, गोरेगाव पुर्व, मुंबई ४०००६७, सत्यप्रतिज्ञेवर कथन करते की, वरील ॲफिडेव्हीट मधील सर्व मजकूर माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केली प्रतिज्ञा आज मुक्काम शाहूवाडी.

दिनांक - २४/०८/२०२६

R. Malvade

Solemnly Affirmed before me by
Shri Riddhi Ramesh Malavade
Age 46 Occu Housework
Of Goregaon Mumbai at present Shahuwadi who is
identified by shri K.R. Pawar
Adv. Whom I know personally
Dated :- 24/8/26

Assistant Superintendent